चार दिवसापासून बसलेले अमरण उपोषण अखेर खा. नागेश पाटील आष्टीकर यांच्या मध्यस्थीने सुटले >> पान 2

राज्यपालांच्या अभिभाषणावरुन आ. सिध्दार्थ खरात विधानसभेत आक्रमक >> पान 3

मेहकर तालुका क्रीडांगणासाठी एक कोटी रुपयांचा निधी >> पान 4

**सुविचार**

दोष लपवला की तो मोठा होतो
आणि कबूल केला की नाहीसा होतो.

दैनिक
# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com
मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034



'छावा'तील कवी कलश, अभिनेत्याने मराठी सिनेमांमध्येही केलंय काम
आतील पान

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई


■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 205 ■ शुक्रवार, दि. 07 मार्च 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

# भय्याजी जोशी यांच्या वक्तव्यावरुन विधिमंडळात गदारोळ

## कोणी काहीही म्हणो, मुंबई आणि महाराष्ट्राची भाषा मराठीच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची ग्वाही

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी : मुंबईत राहणा–याला मराठी भाषा आलीच पाहिजे असे काही नाही. या रा.स्व. संघाचे माजी सरकार्यवाह सुरेश उर्फ भय्याजी जोशी यांनी केलेल्या वक्तव्याला आक्षेप घेत विरोधकांनी आज विधिमंडळात सरकारची कोंडी करण्याचा प्रयत्न केला. मुंबईचे तुकडे करण्याचे काम हा संघाचा छुपा अंजेडा आहे, मुंबई तोडून ती गुजरातमध्ये घेऊन जायची आहे, असा आरोप करत विरोधकांनी घेतलेल्या आक्रमक पवित्र्यामुळे विधानपरिषदेचे कामकाज दोन वेळा तहकूब करावे लागले. तर विधानसभेत विरोधकांनी हा मुद्दा उपस्थित केल्यानंतर सत्ताधारी व विरोधी सदस्यांमध्ये जोरदार खडाजंगी झाली.**



दरम्यान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबई आणि महाराष्ट्राची भाषा ही मराठीच आहे. राज्यातील प्रत्येकाने मराठी भाषा शिकलीच पाहिजे, असे ठणकावून सांगत या वादावर पडदा टाकण्याचा प्रयत्न केला. यावेळी झालेल्या शेरेबाजीमुळे आदित्य ठाकरे आणि मंत्री नितेश राणे यांच्यात जोरदार खडाजंगी झाली. सत्ताधारी व विरोधी सदस्यांमध्ये जोरदार वाद झाल्याने वातावरण स्फोटक झाले होते. अखेर विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी विधानसभेचे कामकाज काही वेळासाठी तहकूब केल्यानंतर वातावरण निवळले.

मुंबईच्या विद्याविहार येथील एका कार्यक्रमात संघाचे माजी सरकार्यवाह भैय्याजी जोशी यांनी, मुंबईत विविध राज्य, प्रांत आणि भाषा बोलणारे नागरिक राहतात. मुंबईत अनेक भाषा आहेत, घाटकोपरची भाषा गुजराती आहे, त्यामुळे मुंबईत येणा–या प्रत्येकाला मराठी शिकले पाहिजे असे नाही असे वक्तव्य केले होते. त्यांच्या या वक्तव्याचे पडसाद विधिमंडळात उमटले. शिवसेनेच्या ठाकरे गटाने या मुद्यावरून फडणवीस सरकारला लक्ष्य केले आहे. विधानसभेत ठाकरे गटाच्या भास्कर जाधव यांनी हा विषय उपस्थित केला. मराठीला आता अभिजात भाषेचा दर्जा मिळाला आहे. मात्र रा.स्व.संघाच्या सुरेश उपाख्य भय्याजी जोशी यांनी घाटकोपर येथे संबोधन करताना घाटकोपरमध्ये गुजराती समाजाची संख्या जास्त आहे. त्यामुळे येथे गुजराती भाषा बोलली गेली तरी हरकत नाही असे विधान केले आहे. यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांची भूमिका स्पष्ट करावी अशी मागणी त्यांनी केली. यावर मुख्यमंत्री फडणवीस यांनी, भय्याजी जोशी नेमके काय म्हणाले हे



मी ऐकलेले नाही. मात्र सरकारची भूमिका स्पष्ट असल्याचे सांगताना, मुंबई–महाराष्ट्राची भाषा ही मराठीच राहणार. महाराष्ट्रात राहणा–या प्रत्येकाने मराठी शिकली पाहिजे, बोलता आली पाहिजे असे ठणकावून सांगितले. त्याचवेळी आम्ही इतर भाषांचाही सन्मान करतो. ज्याचे आपल्या भाषेवर प्रेम असते तो इतरांच्या भाषेवरही प्रेम करतो असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

**आदित्य ठाकरे–नितेश राणे आमने सामने**

फडणवीस यांनी केलेल्या स्पष्टीकरणावर भास्कर जाधव यांचे समाधान झाले होते. पण त्यांच्या पाठोपाठ आदित्य ठाकरे हे बोलायला उभे राहिले. मंत्री नितेश राणे आणि इतर भाजपा सदस्यांनी त्याला आक्षेप घेतला. मुख्यमंर्त्यांनी भूमिका स्पष्ट केली असल्याने त्यावर आता अधिक बोलता येणार नाही, असे त्यांचे म्हणणे होते. यावरून खडाजंगी सुरू झाली. नितेश राणे आणि आदित्य ठाकरे यांच्यात चांगलीच चकमक उडाली. तेव्हा ठाकरेंच्या बचावार्थ वरूण सरदेसाईंसह इतर आमदार पुढे आले. तर नितेश राणे,आशिष शेलार,योगेश सागर हे देखील आक्रमक झाले होते. दोन्ही बाजूच्या सदस्यांकडून जोरदार गदारोळ सुरू झाला. अखेर अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी कामकाज पाच मिनिटांकरिता तहकूब केले.

## ५० हजाराची खंडणी दिली नाही म्हणून मारहाण, आरोपींवर गुन्हा दाखल

**दैनिक आपला विदर्भ**

**नवी मुंबई/प्रतिनिधी :** महापे MIDC परिसरातील एका कंपनी मधून भंगार नेण्याचे कामं करणाऱ्या शौकत शेख या भंगार व्यापाऱ्याला येथून भंगार न्यायचे असेल तर आम्हाला ५० हजार रुपये द्यावे लागतील अन्यथा तुला भंगार नेऊ देणार नाही असं म्हणत काही गाव गुंडानी मारहाण केल्याची घटना घडली आहे. निशान पाटील व त्याच्या सहकाऱ्यांकडून ही मारहाण करण्यात आली असून, मारहाणीनंतर गाड्यांची तोडफोड देखील करण्यात आली आहे. मारहाणी दरम्यान दगड भिरकवण्यात आल्याने या हल्ल्यात शेख हे जखमी झाले असून, त्यांच्यावर खाजगी रुग्णालयात उपचार सुरु आहेत. याप्रकरणी निशान पाटील यांच्यासह त्याच्या सहकाऱ्यांवर रबाळे एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यासेच शेख विरोधात देखील क्रॉस कम्प्लेंट अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सुरु आहे.

## विरोधकांनी राजकारण करणे थांबवावे

### उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा विरोधकांवर टीका

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** भैय्याजी जोशी यांनी त्यांच्या वक्तव्याचे स्पष्टीकरण दिले आहे. त्यामुळे विरोधकांनी राजकरण करणे थांबवावे.असे मत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त करत विरोधकांवर टीका केली.

यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, महाराष्ट्रात मराठी भाषा हीच महत्वाची आहे, बाळासाहेब ठाकरे यांनी देखील मराष्ट्रात मुंबईत मराठी माणसांच्या पाठी उभे राहण्यासाठी शिवसेनेला जन्म दिला. मराठी भाषा महत्वाची असल्याने अभिजात दर्जा दिला गेला. विरोधक जे काही राजकारण करत आहेत ते त्यांना थांबवावे, भैय्याजी जोशी यांनी देखील त्याच्या वक्तव्याचे स्पष्टीकरणं दिले आहे. महाराष्ट्रामध्ये मराठी भाषा आणि मराठीलाच प्राधान्य आहे. महाराष्ट्रात मराठी भाषा आणि मराठी



भाषेसाठी आपण सगळेजण सर्व काही करत आहोत.

मराठी भाषेला आपण दर्जा मिळवून दिला आणि त्यासाठी आपण केंद्र सरकारकडे मागणी देखील केली. त्यामुळे पंतप्रधानांचं अभिनंदन केले. आणि या ठिकाणी बाळासाहेब ठाकरे यांनी अनेक लोकांना मराठी माणसांच्या मागे उभे राहिलेले आहेत. त्यामुळे कोणी किती बोलत आहे. मराठी भाषा आपली मायबोली आहे. त्यामुळे जे कोणी राजकारण करत आहेत त्या लोकांनी राजकारण थांबवावे.भैय्याजी जोशी यांनी सुद्धा त्यांनी त्यांच्या वक्तव्याबद्दल स्पष्टीकरण दिलेल आहे. याचा अर्थ त्यांनी मराठी भाषेचा कुठेही अपमान केलेला नाही. मराठी भाषा मायबोली आहे असं देखील त्यांनी सांगितले.

त्यांनी मराठी भाषेला आणि कुठेही दुय्यम समजलेलं नाही. त्यामुळे याच कोणी राजकारण करू नये, त्यामुळे अनेक लोक वेगवेगळ्या भाषांमध्ये प्रचाराचा टाईमला बॅनर लावत होते. मराठी भाषा विसरले होते. मराठी भाषेला विरोध केला तर, या ठिकाणी मराठी माणूस माफ करणार नाही. असे मत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केले.



## भाजप कार्यालयात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा कार्यकर्त्यांशी संवाद

**कोल्हापूर/प्रतिनिधी :** महायुतीच्या कार्यकर्त्यांनी एकसंघ काम केल्यामुळे राज्यात महायुतीची सत्ता आली, मागच्या वेळी कोल्हापुरात नव्याने बांधण्यात आलेल्या भारतीय जनता पक्षाच्या कार्यालयात आलो, तेव्हा मुख्यमंत्री नव्हतो. आता मुख्यमंत्री होऊन भाजप कार्यालयात आलो, जनतेने दिलेल्या आशीर्वादामुळे आता आपली जबाबदारी वाढली आहे. ती पूर्ण करण्याचा प्रयत्न करू. जिल्ह्यात महायुतीचे सर्व आमदार निवडून देऊन कोल्हापूरकरांनी महायुतीवर विश्र्वास व्यक्त केलाय, असं मत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कोल्हापुरात व्यक्त केलं. कोल्हापुरातील भाजप कार्यालयात कार्यकर्त्यांशी संवाद साधताना मुख्यमंत्री बोलत होते.

## समृद्धी महामार्गावर स्वतंत्र दक्षता पथक व पोलीस चौकी नेमा

### माजी मंत्री सुबोध सावजी यांचे मुख्यमंत्री व बांधकाम मंत्री यांना निवेदन

**दैनिक आपला विदर्भ**

**मेहकर/प्रतिनिधी :** नागपूर मुंबई समृद्धी मार्गावर स्वतंत्र दक्षता पथके व चौक्या नेमाव्यात, अशी मागणी माजी मंत्री सुबोध सावजी यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व बांधकाम मंत्री छत्रपती शिवेंद्रराजे भोसले यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात नमूद केले आहे की, नागपूर ते मुंबई समृद्धी महामार्गावर स्वतंत्र दक्षता पथक व पोलीस चौकी तसेच, नागपूर मुंबई समृद्धी महामार्गावर दहा किलोमीटर मागे एक शेती व्यवसायाशी संबंधित मोठे बोधचिन्ह उभारण्यात यावे. समृद्धी महामार्गाचा भार हा पोलीस स्टेशनवर न टाकता आपले खात्यामार्फत ही यंत्रणा उभारण्यात यावी, जेणेकरून होणारे अपघात टाळता येतील. समृद्धी महामार्गावरील अपघाताचे प्रमाण पाहता हा मार्ग नकोसा वाटत आहे. परंतु, या मार्गाचे फायदे तितकेच आहेत. अपघाताला रोखण्याकरिता समृद्धी महामार्गावरील पोलीस स्टेशन हे त्यांचे कामाचे व्याप्तीने फारसा न्याय देऊ शकत नाही. याकरिता खात्यामार्फत स्वतंत्र दक्षता पथके अथवा पोलीस स्टेशन प्रमाणेच चौक्या निर्माण करण्यात याव्यात.जेणेकरून अपघात टाळल्या जातील.

समृद्धी महामार्गावर वसूल होणारा टोल नाका यामधून हा खर्च फारसा होणार नाही व प्रवाशांनाही सोय होईल. समृद्धी महामार्गावर नाशिकच्या जवळपास ज्याप्रमाणे शेतीसंबंधी बोधचिन्हे उभारण्यात यावी, बैलजोडी, बैलबंडी नांगर अशा प्रकारची बोधचिन्हे या



८०० किलोमीटर मध्ये दहा किलोमीटर मागे एक असे उभारावे, जेणेकरून महाराष्ट्राची अस्मिता शेतकऱ्यांची प्रतिष्ठा व भरधाव वेगाने चालणाऱ्या गाड्यांचे चालकांना विरंगुळा मिळून अपघात होण्यास अडथळा होईल.

सदर मागण्यांची दखल घेत समृद्धी महामार्गावरील प्रवाशांना न्याय द्यावा व जीवदान द्यावे, अशी मागणी माजी मंत्री सुबोध सावजी यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व बांधकाम मंत्री छत्रपती शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

## गणोजी आणि कानोजी सारखी वक्तव्य बंद करावे

### राष्ट्रवादी काँग्रेस प्रवक्ते आनंद परांजपे यांची पत्रकार परिषद

**दैनिक आपला विदर्भ**

**ठाणे/प्रतिनिधी :** महेंद्र थोरवे यांचा औरंग्या कृत्य गोवाहाटीच्या हॉटेलमध्ये टेबलवर नाचताना महाराष्ट्राने बघितले आहे. रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्री पदाबाबत वारंवार सुनील तटकरे आणि आदिती तटकरे यांच्याबाबत खालच्या पातळीवर वक्तव्य करणे हे महेंद्र थोरवे यांनी बंद करावे आणि त्यांच्या अवकातीत राहावे, गणोजी आणि कानोजी सारखी वक्तव्य महायुती विरूद्ध बंद करावे, असा इशारा राष्ट्रवादी काँग्रेस प्रवक्ते आनंद परांजपे यांनी पत्रकार परिषदेत दिला.

यावेळी ते पुढे म्हणाले की, लोकशाहीमध्ये कोण कुठे लढावं हे सर्वांना अधिकार आहे. मात्र, राजकारणात तुमचा जन्म देखील





झाला नव्हता तेव्हापासून सुनील तटकरे रायगडच्या राजकारणात आणि समाजकारणात काम करत आहेत. त्यामुळे तुम्ही ग्रामपंचायत निवडणूक लढवावी या लोकसभेची हा लोकशाहीमध्ये तुमचा अधिकार आहे. औरंगजेब हा क्रूर राज्यकर्ता होता. छत्रपती संभाजी महाराजांना अत्यंत क्रूर पद्धतीने हाल हाल करून त्यांनी मारले. हा इतिहास कोणी बदलू शकत नाही आणि याचे औरंगजेबाबद्दल राष्ट्रवादी शरद पवार गटातील नेते जितेंद्र आव्हाड २०२३ ला काय बोलले होते. बहादूरगड येथे संभाजी राजे यांना कैदेमध्ये ठेवले होते. तेव्हा त्या बाजुची विष्णूची मंदिरे औरंगजेबने तोडली नाही. अशा प्रकारचे वक्तव्य करून नंतर सारवासारव केले. काल देखील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले होते, निषेध करायचा असेल तर जितेंद्र आव्हाड यांचा देखील करा. भैयाजी जोशी यांचं वक्तव्य मी पाहिले नाही. पण घाटकोपर मुंबईत येतो, मुंबई ही महाराष्ट्राची राजधानी आहे.आणि महाराष्ट्रात राहणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला मराठी आलेच पाहिजे महाराष्ट्राची भाषा ही मराठी आहे असे मत पत्रकार परिषदेत राष्ट्रवादी काँग्रेस प्रवक्ते आनंद परांजपे यांनी व्यक्त केले.

## नियम पाळा अपघात टाळा!

गेल्या दहा वर्षात देशभरात झालेल्या अपघातात १५ लाख ३० हजारांहून अधिक अधिक नागरिकांचा मृत्यू झाल्याची आकडेवारी समोर आली आहे. केंद्रीय रस्ते मंत्रालयाने ही आकडेवारी जाहीर केली आहे. केंद्रीय रस्ते मंत्रालयाच्या संकेत स्थळावर ही आकडेवारी उपलब्ध असून त्यानुसार सण २०13 ते २०23 या दहा वर्षात रस्ते अपघातात बळी पडलेल्यांच्या संख्येत महाराष्ट्र तिसऱ्या क्रमांकावर आहे. पहिल्या स्थानावर उत्तर प्रदेश तर दुसऱ्या स्थानावर तामिळनाडू ही राज्ये आहेत. २०20 ते २०२४ या काळात राज्यातील ४५ पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत १ लाख ५९ हजार रस्ते अपघात झाले असून त्यात ७१ हजार लोकांचा मृत्यू झाला आणि लाखो लोक गंभीर जखमी झाले आहेत. महाराष्ट्रासारख्या प्रगतशील राज्यासाठी ही आकडेवारी भूषणावह नाही. रस्ते अपघातात जर इतके लोक दरवर्षी मरण पावत असतील तर ती चिंतेची बाब आहे. विशेष म्हणजे यातील बहुतांशी मृत्यू हे २० ते ५० या वयोगटातील आहे. याचाच अर्थ रस्ते अपघातात सर्वाधिक मृत्यू हे तरुणांचे होत आहेत. ज्या तरुणांकडे देश भावी आधारस्तंभ म्हणून पाहत असतो तेच तरुण जर असे अकाली मृत्यू पावत असेल तर ती देशाची मोठी हानी आहे. केवळ सर्वसामान्य तरुणच नाही तर देशातील अनेक महनीय व्यक्तींचा मृत्यू देखील रस्ते अपघातात झाला आहे. तीन वर्षापूर्वी शिवसंग्राम पक्षाचे संस्थापक अध्यक्ष आणि मराठा समाजाचे नेते विनायक मेटे यांचे अपघाती निधन झाले. त्यांच्या निधनाने मराठा समाजाचीच नव्हे तर राज्याची मोठी हानी झाली. त्यांच्या अपघाती निधनातून राज्य सावरत नाही तोच टाटा उद्योग समूहाचे माजी अध्यक्ष व प्रसिद्ध उद्योगपती सायरस मिस्त्री यांचे अपघाती निधन झाले. सायरस मिस्त्री यांचा गुजरातच्या अहमदाबादवरून मुंबईला जाणाऱ्या मार्गावर चारोटी जवळ सुर्या नदीच्या पुलावर अपघात झाला. सायरस मिस्त्री यांचे देशाच्या औद्योगिक विकासात महत्वाचे योगदान आहे. त्यांच्या निधनाने उद्योग विश्र्वात मोठी शोककळा पसरली होती. सायरस मिस्त्री, विनायक मेटे यांच्यासारख्या समाजातील महनीय व्यक्तींच्या अशा अकाली निधनाने समाजाचे मोठे नुकसान होत आहे. विनायक मेटे, सायरस मिस्त्री हे समाजातील महनीय व्यक्ती आहेत म्हणून त्यांच्या निधनाची बातमी झाली. रस्ते अपघातात दरवर्षी लाखो लोकांचा मृत्यू होतो देशात सर्वात जास्त मृत्यू रस्ते अपघातात होतात. अपघातात जखमी आणि कायमचे जायबंदी होणाऱ्यांची संख्या तर अगणित आहे. विशेष म्हणजे यात तरुणांचा समावेश अधिक आहे. ज्या तरुणांच्या जोरावर आपण महासत्ता होण्याचे स्वप्न पाहत आहोत त्याच तरुणांचे अपघातात निधन होत असेल तर ती देशाची मोठी हानी आहे. अनेक प्रयत्न करूनही देशातील रस्ते अपघातांची संख्या का कमी होत नाही हा संशोधनाचा विषय आहे. वाढत्या रस्ते अपघातांना जितकी व्यवस्था जबाबदार आहेत तितकीच मानवी चुकाही जबाबदार आहेत. टोलच्या माध्यमातून कोट्यवधी रुपयांची वसुली केली जात असतानाच महामार्गावर जीवघेण्या ब्लॅकस्पॉट मध्ये सुधारणा होत नाही. त्याचप्रमाणे रस्त्यांवरील खड्डे, धुळीचे साम्राज्य, महामार्गावरील अतिक्रमणे, सर्व्हिस रोडचा अभाव, रस्त्यावरच उभी केली जाणारी अवजड वाहने, बंद पडलेल्या वाहनांसाठी कमी पडत असलेली मदत केंद्रे, मोकाट जनावरे, अपुरे दुभाजक याबाबी अपघातांसाठी कारणीभूत ठरत आहेत. महामार्गावर वाहन चालकांकडून वेग मर्यादा पाळण्यात येत नाही. बहुतेक प्रवासी १०० किमी पेक्षा अधिक वेगाने वाहने चालवतात. ट्रक व इतर मोठ्या वाहनांकडून लेनची शिस्त पाळली जात नाही. काही वाहन चालक तर दारु पिऊन वाहने चालवतात तर काही वाहन चालक वाहन चालवत असताना मोबाईलवर बोलतात. वाहनांची व्यवस्थित निगा न राखणे, सीट बेल्ट न लावणे या गोष्टीही अपघातास कारणीभूत ठरतात. नियम माहीत असूनही चालक त्यांचे पालन करत नाहीत. सगळ्यांनाच कमी वेळात आपले ठिकाण गाठायचे असते. नियमांचे पालन न केल्यानेच अपघातांची संख्या कमी होत नाही. अपघातांची संख्या कमी करायची असेल तर वाहन चालकांना नियमांचे पालन करावेच लागेल. नियम पाळा अपघात टाळा!

# चार दिवसापासून बसलेले अमरण उपोषण अखेर खा. नागेश पाटील आष्टीकर यांच्या मध्यस्थीने सुटले

**दैनिक आपला विदर्भ**

**उमरखेड :** विडुळ येथील नागरिकांचे घरकुल यादी ला नाव असून सुद्धा घरकुल पासून वंचित ठेवल्याने ,ग्रामपंचायत कार्यालय विडुळ येथे घरकुल का देत नसल्याचे जाब विचारला असता,यावर भेदभाव पूर्ण वागणूक देऊन लाभ देत नसल्यामुळे या संदर्भात एक महिन्यापासून ग्रामपंचायत कार्यालय,बीडीओ यांना सर्वांना निवेदन देऊन सुद्धा दखल घेत नसल्याने विडुळ येथील अनिल कांबळे व सर्व सहकारी चार दिवसापासून उमरखेड येथे अमरण उपोषण ला बसले होते . पण या चार दिवसात एक ही संबंधित अधिकारी किंवा लोकप्रतिनिधी भेट दयाला आल्या नसल्याने उपोषण चालूच होते.याच दरम्यान अनिल कांबळे व त्यांचे सहकारी उपोषणास बसल्यांने तब्येत खालावत असल्याची



माहिती खासदार यांना मिळताच, हिंगोली लोकसभा क्षेत्राचे लोकप्रिय खासदार नागेश दादा पाटील आष्टीकर उपोषण स्थळी जाऊन,ताबडतोब दखल घेत उमरखेड पंचायत समितीचे बी. डी. ओ किरण कोळपे व ग्रामसेवक वारकड यांना उपोषण स्थळी बोलावून धारेवर धरत तुम्ही उपोषणकर्त्यांच्या मागण्या काय आहे ते का पूर्ण केले नाहीचा प्रश्न विचारला . तुम्ही ५६८ लाभार्थ्यांपैकी २०४ लोकांना या घरकुल योजनेचा लाभ दिला असून. उर्वरित सर्व लोकांना या योजनेचा लाभ का दिला नाही? या लोकांना लवकरात लवकर लाभ द्या.गावातील काही लोक पुन्हा यापासून वंचित असतील त्यांचे सुद्धा नावे या यादीत

**तुम्ही या बद्दल बी. डी. ओ. साहेबाला का कळवलं नाही?त्यांची राय का घेतली नाही? इथे एवढे मांजळे लोक उपोषण ला बसतात त्यांची दखल घेण्यासाठी कोणी तरी येईल तिथे चौकशी होऊन आपल्याला हे मान्य करावे लागेल हे माहिती असताना तुम्ही कोणाच्या भरोस्यावर देत नाही केवडी हिम्मत! तुमच्या चौकशी ला मी येऊ का?बी. डी. ओ साहेब यांना इथेच नोटीस द्या. आम्ही जनतेसाठी एवढे निधी आणतो.तरी हे देत नाही तुमच्या नजरे समोर आणत नाही यातला एखादा उपोषण करताना मेला असता याचा जीमेदार कोण राहील? अशा या ग्रामसेवकाची बदली कारण्याची नोटीस देऊन उपोषण कर्त्यांना लाभ द्या.**

टाकून सर्वांना घरकुलाचा लाभ मिळालाच पाहिजे या प्रकारच्या सर्व सूचना त्यांनी बी.डी.ओ. ना दिल्या. गावाचा विकास करताना कस ल्याही प्रकारचा राजकारण करू नका सर्व गोर गरिबांना न्याय मिळाला पाहिजे अशा पद्धतीची सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या व उपोषणाची सांगतता केली.यावेळी शिवसेनेचे सहसंपर्कप्रमुख एडवोकेट बळीराम मुटकुळे तालुकाप्रमुख सतीश नाईक,राष्ट्रीय काँग्रेसचे तालुका अध्यक्ष दत्तराव शिंदे.,तालुका संपर्कप्रमुख निलेश जैन,शाखाप्रमुख प्रकाशराव फटाले, युवासेना उपजिल्हाप्रमुख नितीन शिंदे, लक्ष्मण धुळे असंख्य शिवसैनिक गावातील प्रतिष्ठित नागरिक व महिला भगिनी सुद्धा उपस्थित होत्या.

# निराधारांना अनुदानाचे तीन हजार रुपये मिळणार !

**■ विशेष सहाय्य योजना अनुदान वितरणाला सुरुवात ■ आधार प्रमाणीकरण असेल तरच अनुदानाचा आधार ! ■ १,१६,६१४ लाभार्थ्यांच्या खात्यात डिसेंबर, जानेवारीचे अनुदान जमा ■ आधार प्रमाणीकरण झालेल्या लाभार्थ्यांच्या खात्यात फेब्रुवारी व मार्च चे अनुदान ६ मार्च रोजी जमा**

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी :** जिल्ह्यातील संजय गांधी निराधार योजना व श्रावणबाळ योजनेंतर्गत आधार प्रमाणीकरण केलेल्या लाभार्थ्यांच्या खात्यात फेब्रुवारी व मार्च या दोन महिन्याचे तीन हजार रुपये वितरित करण्यास सुरुवात झाली आहे. या योजनेच्या एकूण १,८१,९०८ पैकी १,१६,६१४ लाभार्थ्यांचे आधार प्रमाणीकरण झाले असल्याने त्यांना डिसेंबर २०२४ व जानेवारी २०२५ चे अनुदान देण्यात आले आहे आणि ज्या लाभार्थ्यांचे आधार प्रमाणीकरण झाले आहे त्यांनाच फेब्रुवारी व मार्च महिन्याचे अनुदान मिळणार आहे, अशी माहिती विजय सवडे तहसीलदार संजय गांधी योजना यांनी दिली आहे.



जिल्ह्यात विशेष सहाय्य योजनेअंतर्गत एकूण २,३५,३०५ लाभार्थी आहेत. त्यापैकी राज्य शासनाच्या संजय गांधी व श्रावण बाळ योजनेअंतर्गत एकूण १,८१,९०८ लाभार्थी असून केंद्र शासनाच्या इंदिरा गांधी वृद्धापकाळ, दिव्यांग, विधवा पेन्शन योजनेचे ५३,३९७ लाभार्थी आहेत. या दोन्ही योजनांचे राज्य शासनाचे अनुदान लाभार्थ्यांना डिसेंबर २०२४ पासून डीबीटीद्वारे वाटप करण्यात येत आहे. लाभार्थ्यांना डीबीटीद्वारे अनुदान वाटप होण्यासाठी लाभार्थ्यांचे आधार प्रमाणीकरण डीबीटी पोर्टलवर होणे आवश्यक आहे. आधार प्रमाणीकरणासाठी लाभार्थ्यांचे आधार अद्ययावत व आधारला मोबाईल क्रमांक जोडलेला असणे आवश्यक आहे.

**तहसिलमध्ये आधार प्रमाणीकरणाची सुविधा**

या अनुदान योजनेच्या लाभार्थ्यांनी आधार प्रमाणीकरणासाठी तहसिल कार्यालयात उपस्थित राहुन प्रक्रिया पूर्ण करणे आवश्यक आहे.

**आधार व मोबाईल आवश्यक**

संजय गांधी योजना व श्रावणबाळ योजनेच्या लाभार्थ्यांनी आधार प्रमाणीकरणासाठी अद्ययावत आधार कार्ड व आधारला जोडलेला मोबाईल क्रमांक सोबत आणणे आवश्यक आहे.

संजय गांधी व श्रावण बाळ योजनांचे आधार प्रमाणीकरण झालेल्या लाभार्थी यांना फेब्रुवारी व मार्च महिन्याचे अनुदान दिनांक ६ मार्च रोजी वितरित करण्यात आले आहे. तसेच केंद्र पुरस्कृत इंदिरा गांधी वृद्धापकाळ, दिव्यांग,विधवा पेन्शन योजनेतील आधार प्रमाणीकरण झालेल्या लाभार्थ्यांना माहे फेब्रुवारी व मार्च २०२५ चे राज्याचे अनुदान प्रत्येकी १२००/१३०० रुपये सोमवार दिनांक १० मार्च २०२५ रोजी डीबीटी पोर्टलद्वारे वितरित करण्यात येणार आहे, अशी माहिती संजय गांधी योजना तहसीलदार विजय सवडे यांनी दिली

लाभार्थ्यांनी आधार प्रमाणीकरण करावे विशेष सहाय्य योजनेंतर्गत ज्या लाभार्थ्यांना डिसेंबर व जानेवारी महिन्याचे अनुदान प्राप्त झाले नाही, त्यांनी आधार प्रमाणीकरण पूर्ण करणे गरजेचे आहे. जे लाभार्थी आधार प्रमाणीकरण करणार नाहीत त्यांना यापुढे संजय गांधी व श्रावणबाळ योजनेचे अनुदान मिळणार नाही, त्यामुळे लाभार्थ्यांना आधार प्रमाणीकरण पूर्ण करुन घ्यावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

# 'छावा'तील कवी कलश, अभिनेत्याने मराठी सिनेमांमध्येही केलंय काम

**मुंबई/प्रतिनिधी :** विकी कौशल, रश्मिका मंदाना, अक्षय खन्ना स्टारर 'छावा' सिनेमा २०२५ चा मोठा ओपनर ठरला आहे. 'छावा' सिनेमा अनेक रेकॉर्ड मोडत ब्लॉकबस्टर ठरला आहे. लक्ष्मण उतेकर दिग्दर्शित 'छावा'ने जगभरात आपली छाप सोडली. प्रेक्षकांच्या मनातही जागा केली. त्यामुळे सिनेमा रिलीज होताच थिएटर हाऊसफुल्ल पाहायला मिळाले. या सिनेमातील प्रत्येक कलाकाराच्या भूमिकेची एक वेगळीच छाप प्रेक्षकांवर पडली. 'छावा' सिनेमातील प्रत्येक कलाकारांचं त्यांच्या दमदार भूमिकेसाठी कौतुक झालं. यातील एक भूमिका म्हणजे, कवी कलश.

'छावा' सिनेमामध्ये कवी कलशची भूमिका अभिनेता विनीत कुमार सिंगने साकारली होती. अतिशय उत्तमरित्या त्याने ही भूमिका निभावली देखील. त्यामुळे आता 'छावा'तील कवी कलशला कोणी विसरूच शकत नाही. मात्र 'छावा'च्या अगोदर विनीत सिंगने अनेक चांगल्या आणि दमदार सिनेमांमध्ये काम केलं आहे. त्याने मराठी सिनेमांमध्येही भूमिका साकारल्या आहेत.

कवी कलश म्हणजेच अभिनेता विनीत सिंगने त्याच्या करिअरची सुरुवात मॉडेलिंगमधून झाली. मूळचा वाराणसीचा असलेल्या विनीतच्या करिअरच्या सुरुवातीमध्ये दिग्दर्शक महेश मांजरेकर यांचा मोठा हात आहे. अभिनेत्याने स्वतः याविषयी सांगितलं. 'नवभारत टाइम्स'ला दिलेल्या मुलाखतीत त्याने त्याच्या करिअरची सुरुवात कशी झाली? याविषयी सांगितलं.

विनीत कुमारने या मुलाखतीमध्ये सांगितलं, ''सुपरस्टार टॅलेंट हंट' हा रिॲलिटी शो केला होता. तिथे माझ्या प्रतिभेकडे दिग्दर्शक महेश मांजरेकर यांनी लक्ष दिले आणि मला त्यांच्यासोबत काम करण्याची संधी दिली. मी त्यांच्यासोबत सहाय्यक दिग्दर्शक म्हणून काम करू लागलो. त्या काळातच माझ्या अभिनय करिअरची सुरुवात झाली. महेश मांजरेकर यांच्या 'पिता' आणि 'हत्यार' या चित्रपटांमध्ये मी छोट्या भूमिकांतून झळकलो.

# मुलींचा जन्मदर वाढविण्यासाठी कायद्याची कडक अंमलबजावणी आवश्यक

**दैनिक आपला विदर्भ**

## गर्भधारणापुर्व व प्रसवपुर्व निदान तंत्र कायद्याची जिल्हास्तरीय कार्यशाळा

**बुलढाणा/प्रतिनिधी :** जिल्ह्यातील मुलींचा जन्मदर वाढविण्यासाठी पीसीपीएनडीटी व एमटीपी कायद्याची कडक अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. यासाठी स्वयंसेवी संस्था, संघटना, वैद्यकीय अधिकारी व नागरिकांच्या सहकार्याने विविध उपक्रमाच्या माध्यमातून समाजामध्ये जनजागृती करावी, असे आवाहन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. भागवत भुसारी यांनी केले.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय पीसीपीएनडीटी कार्यक्रमा अंतर्गत पीसीपीएनडीटी व एमटीपी कायद्याची कडक अंमलबजावणी तसेच कायद्या अंतर्गत खबऱ्या योजना याबाबत जनजागृती करण्यासाठी एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आयएमए संघटनाचे अध्यक्ष डॉ.अजित सिरसाट, फॉग्सी संघटनाचे अध्यक्ष डॉ. चंद्रकिरण पवार,रेडीओलॉलिस्ट संघटनचे अध्यक्ष डॉ.संजय बोथरा, वुमेन्स फोरमचे अध्यक्ष डॉ.माधुरी जवरे, होमियोपॅथी संघटनचे डॉ.दुर्गासिंग जाधव, युनानी संघटनाचे डॉ. शौकत कबिर, सामाजिक कार्यकर्त्या डॉ. वैशाली पडघान, शाहिना पठाण आदी उपस्थित होते.

डॉ. भुसारी म्हणाले, जिल्ह्यातील मुलींचा जन्मदर वाढविण्यासाठी सर्व स्तरातून पराकाष्ठा करणे गरजेचे आहे. यासाठी सोनोग्राफी केंद्रांची तपासणी नियमितपणे करावी. तसेच प्रत्येक केंद्रामध्ये पीसीपीएनडीटी कायद्यानुसार बोर्ड, केंद्र नोंदणी प्रमाणपत्र, कलम ९ नुसार गर्भवती महिला नोंदणी रजिस्टर, संमतीपत्र इत्यादी गोष्टींची सोनोग्राफी केंद्रधारक पुर्तता होत आहे किंवा नाही यांची खात्री करावी. गर्भनिदान किंवा कायद्याची अंमलबजावणी होत नसल्यास त्याबाबतची माहिती तातडीने उपलब्ध करु द्यावे, असे आवाहन यावेळी केले.




सामाजिक कार्यकर्त्या डॉ. वैशाली पडघन म्हणाले की, जिल्ह्यातील मुलींचा जन्मदर कमी असून जन्मदर वाढीसाठी सर्वांचे प्रयत्न आवश्यक असल्याचे सांगितले. तसेच पीसीपीएनडीटी व एमटीपी कायद्याची माहिती यावेळी दिली. महिला सर्वच क्षेत्रामध्ये नावलौकिक मिळवत आहे. त्यामुळे मुलींना कमी न लेखता मुलींच्या जन्माचे स्वागत करा, असे आवाहन डॉ. अजित सिरसाट यांनी केले. कार्यक्रमाचे प्रस्तावना विधी समुपदेशक ड. वंदना काकडे यांनी केले. सुत्रसंचालन जिल्हा रुग्णालयाचे साहेबराव सोळंके यांनी तर आभार ज्ञानेश्वर मुळे यांनी मानले.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# राज्यपालांच्या अभिभाषणावरुन आ. सिध्दार्थ खरात विधानसभेत आक्रमक

## ■ मेहकर तालुक्यातील २० गावांचा डोंगरी क्षेत्रात समावेश करा
## ■ सोयाबीनला २ हजार भावफरक देवून शासनाने खरेदी करावी




दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी : प्रशासकीय कामाचा प्रदीर्घ अनुभव असलेले मेहकर – लोणार मतदारसंघाचे आमदार सिध्दार्थ खरात ६ मार्च रोजी विधानसभेत राज्यपालांच्या अभिभाषणावरुन चांगलेच आक्रमक झाल्याचे पाहायला मिळाले. डोंगरी क्षेत्र असलेल्या भागातून मेहकरला वगळण्यात आले. हा मुद्दा सभागृहाच्या लक्षात आणून देत मेहकरचा डोंगरी क्षेत्रात समावेश करावा तसेच सोयाबीनला २ हजार भावफरक देवून शासनाने नाफेड अंतर्गत खरेदी करावी, अशी आग्रही मागणी आमदार सिध्दार्थ खरात यांनी केली.**

### ५० टक्के सोयाबीन अद्याप शेतकऱ्यांकडे पडून

आमदार सिद्धार्थ खरात म्हणाले की, सोयाबीनची ५० टक्के खरेदी अद्याप काही जिल्ह्यांमध्ये (बुलडाणासह) शिल्लक आहे. तसेच सोयाबीनला दिलेला हमी भाव ४८९२ इतका असताना प्रत्यक्षात नाफेडद्वारे सुरु केलेली खरेदी उशीरा सुरु झाल्याने त्यापूर्वी मातीमोल भावाने विकलेल्या सोयाबीनला रुपये ३००० व हमीभावात विकलेल्या सोयाबीन शेतकऱ्यांना प्रति क्विंटल २००० असा भावफरक देण्याची आवश्यकता आहे. उर्वरित सुमारे ५० टक्के सोयाबीन अद्याप शेतकऱ्यांकडे पडून असून नाफेडने ही खरेदी बंद केली आहे. त्यामुळे उर्वरित सोयाबीन खरेदी शासनाने करणे आवश्यक असल्याचे आमदार सिध्दार्थ खरात यांनी सांगितले.

### औद्योगिक वसाहत विकसित करा

मेहकर लोणार मतदार संघातील मेहकर व लोणार येथील औद्योगिक वसाहत वर्षानुवर्षांपासून ओसाड पडलेली आहे. या औद्योगिक वसाहतीचा विकास करावा तेथे प्लॉट पाडून ते उद्योग करणाऱ्या लोकांना वाटप करावे , अशी मागणी आमदार सिद्धार्थ खरात यांनी विधानभवनात करत अनेक प्रश्नांना वाचा फोडली. मेहकर येथे सन १९८९ मध्ये औद्योगिक वसाहत विकसित करण्यात आली होती. मात्र, तेव्हापासून या औद्योगिक वसाहतीवर कोणत्याही प्रकारचा उद्योग उभा राहिला नाही. परिणामी, या भागाचा विकास खुंटलेला आहे.मेहकर येथील शेकडो हेक्टर जागेवर अतिक्रमण केलेला आहे. औद्योगिक विकेंद्रीकरण करण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी कोणताही पुढाकार घेतला नाही, एक अधिकारी अमरावती येथे बसतो तर, दुसरा बुलढाण्यात त्यामुळे या भागातील औद्योगिक विकास करण्यासाठी चालना मिळालेली नाही.मेहकर येथील औद्योगिक वसाहत विकसित करून तेथील प्लॉट उद्योग करणाऱ्यांना वाटप करावे, अशी मागणी आमदार सिद्धार्थ खरात यांनी विधानभवनात केली.त्याचबरोबर जागतिक वारसा लाभलेल्या लोणार येथील विकास करण्यासंदर्भात सुद्धा आतापर्यंत कोणताही पुढाकार घेण्यात आला नाही. परिणामी, जागतिक दर्जाचे पर्यटन पर्यटन स्थळ लाभूनही त्या ठिकाणी भकास अवस्था आहे. लोणारचा विकास करण्यासाठी ही विशेष लक्ष द्यावे त्यासाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून द्यावा अशी मागणी आमदार सिद्धार्थ खरात यांनी केली.

राज्यपालांच्या अभिभाषणावर आक्षेप नोंदवतांना आ. सिध्दार्थ खरात म्हणाले की, महापुरुषांच्या नावामध्ये लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या नावाचा समावेश करणे आवश्यक आहे. महाराष्ट्र कर्नाटक सीमावाद सोडविण्यासाठी सर्वोच्च न्यायालयात महाराष्ट्राचे प्रतिनिधीत्व करण्यासाठी केवळ तज्ञ वकीलांची नियुक्ती करुन काहीही साध्य होणार नाही. तर, आज रोजी महाराष्ट्रातून कर्नाटकात जाणाऱ्या एसटी महामंडळाच्या बसेस रोखण्यात येत आहेत, विविध क्षेत्रात मराठी भाषिकांची अडवणूक करण्यात येत आहे. दोन्ही मुख्यमंत्र्यांनी एकत्र येवून सकारात्मक निर्णय घेतला आहे. अशी बाब भाषणामध्ये येणे अपेक्षित होती. महाराष्ट्राचे उत्पादन देशांतर्गत उत्पादनामध्ये १४ टक्क्यांपेक्षा अधिक आहे. हे या शासनाचे योगदान नसून गेल्या ६५ वर्षापासून महाराष्ट्र राज्याच्या विविध शासनाने केलेल्या निरंतर कामाची फलश्रुती आहे.

जानेवारी २०२५ मध्ये स्वित्झलडमधील दोवोस येथे झालेल्या जागतिक आर्थिक परिषदेमध्ये आंतरराष्ट्रीय कंपन्यांनी सुमारे १५ लाख ७२ हजार कोटी रुपये गुंतवणुकीचा सामंजस्य करार करुन १५ लाखापेक्षा अधिक रोजगाराच्या संध्या निर्माण होतील असे नमूद केले असून ही शुध्द धुळफेक आहे. आंतरराष्ट्रीय कंपन्यांचे सामंजस्य करार कागदावर दाखवून लाखो युवकांना रोजगाराच्या संध्या दिल्याच्या मनोरंजक कथा केवळ कागदावर व प्रसिध्दीसाठी दाखवण्यात आल्या आहेत. प्रत्यक्षात वास्तवात अशा कोणत्याही कंपन्यांनी इतका मोठा रोजगार निर्माण केलेला नाही. तसे नसते तर राज्यातील बेरोजगारी वाढली नसती. आज रोजी अनेक भौगोलिक परिस्थिती लक्षात घेवून कोणत्याही अनेक उद्योजकांना उद्योजक बनवले नाही अथवा अशा सोयी सुविधा ग्रामीण भागात उपलब्ध करुन देण्यात आलेल्या नाही. बेरोजगारी तर चरमसिमेवर पोचली आहे. औद्योगिक विकासाची बाब अतिशय पोकळ असून माझ्या मतदार संघासह हजारो एकर औद्योगिक प्रयोजनासाठी अधिग्रहित केलेल्या जमिनीवर अतिक्रमण झाले असून ना जमीन ना उद्योग अशी स्थिती झाली आहे. मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षण योजना ही कागदावरच असून प्रशिक्षणार्थी युवकांच्या किती रोजगार क्षमता वाढल्या याबद्दल जाहीर करणे आवश्यक आहे.मेहकर तालुक्यातील २० गावांचा डोंगरी भागात समावेश करावा, कंत्राटी कर्मचाऱ्यांना शासनाने नियमित करावे, मेहकर तालुक्यातील सुमारे २० गांवांचा डोंगरी क्षेत्राचा दर्जा बदलल्यामुळे या भागातील युवकांना नोकरी व इतर सोई सुविधांपासून वंचित आहे. शासनाने या भागाला डोंगरी क्षेत्राचा दर्जा प्रदान करावा. केवळ आरोग्य विभागच नव्हे तर, शासनाच्या विविध खात्यामध्ये अस्थायी स्वरुपात काम करत असलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना शासनाने नियमित करण्यात यावे. अशी सुधारणा माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात असणे आवश्यक आहे. तरी, वरील प्रकारच्या सुधारणा राज्यपालांच्या अभिभाषणात करण्यात याव्या, अशी मागणीही आमदार सिध्दार्थ खरात यांनी केली आहे.

## संक्षिप्त...

### सराईत रिक्षा चोरट्याला ठोकल्या बेड्या कल्याण कोळशेवाडी पोलिसांची कारवाई

दैनिक आपला विदर्भ

**कल्याण/प्रतिनिधी :** कोळशेवाडी पोलीस ठाणे हद्दीतील सराईत रिक्षा चोरट्याला पोलिसांनी बेड्या ठोकून चार रिक्षा जप्त केले आहेत.ही कारवाई कल्याण कोळशेवाडी पोलिसांनी केली. राजेंद्र जाधव असे चोरट्याचं नाव आहे. प्राप्त माहितीनसार कल्याण डोंबिवलीत रिक्षा चोरून कर्जत परिसरात विकत असल्याची गोपनीय माहिति कोळशेवाडी पोलीस ठाणे पोलिसांना मिळाली.या माहितीवरून पोलिसांनी सापळा रचत आरोपी राजेश जाधव याला ताब्यात घेत चौकशी केली असता त्याच्याकडून चार रिक्षा जप्त करण्यात आले.तसेच त्याच्या विरोधात याआधी ही देखील डोंबिवली मानपाडा कोळशेवाडी पोलीस ठाण्यात चोरीचे गुन्हे दाखल आहेत. पोलिसांनी आरोपी राजेंद्र जाधव याला अटक केली आहे अशी माहिती डीसीपी अतुल झेंडे यांनी दिली.

### चोपडा तालुक्यात शेतकऱ्याकडून टरबूज काढणीला सुरुवात

दैनिक आपला विदर्भ

**जळगाव/प्रतिनिधी :** वाढत्या तापमानामुळे नागरिकांकडून फळाच्या मागणीत वाढ झाली आहे. यावर्षी चोपडा तालुक्यात मोठ्या प्रमाणावर शेतकऱ्यांनी टरबूजाची लागवड केली गेली आहे. आणि आता मोठ्या प्रमाणावर टरबूज काढणीला सुरुवात झाली आहे. परंतु गेल्या वर्षाच्या तुलनेत यावर्षी टरबूजाला भाव कमी मिळाला आहे. गेल्यावर्षी टरबूज लागवड कमी होती त्यामुळे भाव मिळाला या वर्षी लागवड जास्त असल्यामुळे त्याचा परिणाम भावावर दिसून येत आहे. यावर्षी रोगाचा प्रादुर्भाव व फवारणी खर्च इतर खर्च देखील मोठ्या प्रमाणावर शेतकऱ्यांनी केलेला आहे. मात्र त्या मानाने भाव कमी मिळत आहे. रासायनिक फवारणी मुळे टरबूज पिकाच्या फळधारणेवर परिणाम होत असल्याने सेंद्रीय पद्धतींचा वापर केल्यास त्याचा फायदा चांगला होऊ शकतो. आणि फळाला चांगला भाव मिळू शकतो. सध्या टरबूजांची आवक जास्त असल्याने भाव कमी आहे परंतू फळांची गुणवत्ता चांगली असल्यास त्याला चांगला भाव मिळू शकतो, त्यामुळे इतर शेतकऱ्यांनी सेंद्रीय पद्धतीचा वापर करावा असे आवाहन शेतकरी योगराज पाटील यांनी केले आहे.



## पुण्यात महागड्या गाड्या चोरून संभाजीनगरमध्ये विक्री करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश




दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** पुण्यातील महागड्या गाड्या चोरून त्या गाड्या संभाजीनगरमध्ये विकणाऱ्या टोळीचा संभाजीनगर येथील सिडको पोलीस ठाण्याच्या पोलिसांनी पर्दाफाश करत महागड्या गाड्या चोरणाऱ्या चोरट्यांच्या मुसक्या आवळल्या आहेत.

पुणे महानगरातील विविध भागातून महागड्या गाड्या ह्या चोरून त्या गाड्या छत्रपती संभाजीनगर येथील विविध भागात तसेच ग्रामीण भागात विक्री करणाऱ्या टोळीच संभाजीनगर सिडको पोलीस ठाण्याच्या पोलिसांनी पर्दाफाश करत मुसक्या आवळल्या आहेत. पोलिसांनी महानगरातून गड्या चोरून विक्री करणाऱ्या चोरट्यांना अटक केल्याने अनेक गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता वर्तवली जात आहे. त्याचबरोबर दुचाकी चोरट्यांचे रॅकेट उघड होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.पुणे शहरातून महागड्या गाड्या चोरी करून छत्रपती संभाजी नगर शहरांमध्ये विक्री करणाऱ्या टोळीला सिडको पोलिसांनी अटक केली आहे. प्रथमेश संतोष अंदुरे, आकाश विजय पगारे, रुपेश राजू नवपुते, आदित्य राजेंद्र जोशी असे आरोपींची नावं आहेत. आरोपीच्या ताब्यातून पाच लाख रुपये किमतीच्या चार दुचाकी जप्त करण्यात आल्या आहेत. अशी माहिती सिडको पोलीस ठाण्याचे उपनिरीक्षक अनिल नाणेकर यांनी दिली आहे.

## धनंजय मुंडे, वाल्मिक कराड यांचे फोटो शौचालयात लाऊन संभाजी ब्रिगेडचे अनोखे आंदोलन



दैनिक आपला विदर्भ

**नाशिक/प्रतिनिधी :** सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येचे व्हिडिओ आणि फोटो व्हायरल झाल्यानंतर राज्यभरात संदर्भाची लाट पसरली आहे. याचे तीव्र पडसाद नाशिक मध्ये देखील उमटायला सुरुवात झाली असून नाशिक मध्ये आज संभाजी ब्रिगेडच्या वतीने सुलभ शौचालयाच्या बाहेर आंदोलन करण्यात आलं आहे. धनंजय मुंडे आणि वाल्मिक कराड यांचे फोटो शौचालयात लावण्यात आले असून मूत्रविसर्जन आंदोलन केलंय. दरम्यान वाल्मिक कराड आणि संतोष देशमुख यांचे फोटो



शौचालयाच्या बाहेर फाडून निषेध नोंदवलाय त्यांच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी केली वाल्मिक कराड सारख्या नीच प्रवृत्तीला फाशीची शिक्षा देण्यात यावी त्याच प्रमाणे धनंजय मुंडे यांना सह आरोपी करावे अशी मागणी देखील संभाजी ब्रिगेडच्या कार्यकर्त्यांनी केलीय.

# २०२३-२०२४ ची पिक विम्याची नुकसान भरपाई केव्हा भेटणार; शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी

दैनिक आपला विदर्भ

■ अशोक मुंढे

### अर्थसंकल्पातून कर्जमाफी आणि पीक विम्याची नुकसान भरपाईची अपेक्षा

**महारचिकना :** जिल्ह्यातील सोयाबीनचे घटलेले उत्पन्न आणि शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च यामध्ये खूप मोठी तफावत आहे कारण सोयाबीनचा उत्पादन खर्च हा सोयाबीनच्या उत्पादनापेक्षा जास्त झालेला आहे त्यामुळे शेतकरी त्यांच्यावर असलेलं बँकेचं कर्ज किंवा इतर सावकारी कर्ज फेडू शकत नाही कारण सोयाबीनचा ४८९२ रुपये हा भाव उत्पादन खर्चापेक्षा खूप कमी असल्यामुळे यावर्षी सोयाबीनचे पीक पूर्ण तोट्यात गेले आहे तसेच मागीलवर्षी लोणार तालुक्यातील अंजनी खुर्द महसूल मंडळात २०२३ व २०२४ साली खरीप हंगामातील सोयाबीन पिकाचे अवेळी पावसाने खूप नुकसान झाले होते त्या नुकसानीचे पिक विमा कंपनीच्या कर्मचाऱ्यांनी ठिकाणावर येऊन पंचनामे सुद्धा केले होते तरी अद्यापही २०२३ च्या खरीप हंगामाची पिक विमा नुकसान भरपाई अद्यापही मिळाली नाही तसेच २०२३ २४ च्या रब्बी हंगामातील हरभरा पिकाची सुद्धा अवेळी पावसाने खूप सारी नुकसान झाले होते त्याचे सुद्धा अंजनी खुर्द महसूल मंडळातील तसेच इतरही महसुल मंडळातील बऱ्याच गावातील शेतकरयांचे हरभरा पिकाचे नुकसान झाले होते त्यातही सुद्धा शेतकऱ्यांचे शेतात येऊन पिक विमा कंपनीच्या अधिकाऱ्यांनी पंचनामे सुद्धा केले होते ते सुद्धा पैसे अद्याप कुठल्या शेतकऱ्यांना मिळाले नाही विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर शासनाने शेतकऱ्यांना आमचे सत्ता आल्यास आम्ही तात्काळ शेतकऱ्यांना पिक विमा नुकसान भरपाई व कर्जमाफी देऊ असे आपल्या जाहीरनाम्यात सांगितले होते त्यामुळे महायुती सरकारचा पहीलाच अर्थसंकल्प असल्याने शेतकऱ्यांच्या अपेक्षा वाढल्या आहेत राज्य शासनाच्या कर्जमाफी विषयी कुठलेही हालचाली दिसत नाहीत त्यामुळे सुरू असलेल्या विधीमंडळाच्या अधिवेशनात शासनाने शेतकऱ्याचे थांबलेले पिक विमा नुकसानभरपाई व कर्जमाफी जाहीर करावी अशी मागणी परिसरातील शेतकरी बांधव करीत आहे



# मेहकर तालुका क्रीडांगणासाठी एक कोटी रुपयांचा निधी

## आमदार सिद्धार्थ खरात यांच्या पाठपुराव्याला यश

## ग्रामीण भागातील खेळाडूंना मिळणार सुविधा



**दैनिक आपला विदर्भ**

**मेहकर/प्रतिनिधी : ग्रामीण भागातील खेळाडूंना अधिकाधिक सोयी सोयी सुविधा मिळून त्यांनी खेळात नावलौकिक कमवावे, यासाठी महाराष्ट्र शासनाच्या वतीने क्रीडा व युवक कल्याण मंत्री दत्तात्रय भरणे यांच्यावतीने मेहकर तालुका क्रीडांगणासाठी विकासासाठी तब्बल एक कोटी रुपयाचा निधी मंजूर केला आहे.या निधीतून मेहकर तालुक्यातील व मेहकर शहरातील खेळाडूंना सोयीसुविधा मिळण्यास मोठी मदत होणार आहे. येथील क्रीडांगणाचा विकास झाल्यास अनेक खेळाडू हे राज्य व राष्ट्र पातळीवर चमकदार कामगिरी दाखवण्यासाठी याचा फायदा होणार आहे.**

मेहकर येथील तालुका क्रीडा संकुल बांधकामासाठी तसेच तालुका क्रीडांगणा इतर सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आमदार सिद्धार्थ खरात यांनी शासनाकडे सतत पाठपुरावा केला होता. या पाठपुराला अखेर यश आले असून क्रीडा व कल्याण युवक मंत्री दत्तात्रेय भरणे यांनी मेहकर तालुका क्रीडांगणासाठी तब्बल एक कोटी रुपयांचा निधी जाहीर करून वितरीत केला आहे. महाराष्ट्राला क्रीडा क्षेत्राचा ऐतिहासिक वारसा आहे. हा वारसा पुढे नेत आपल्या राज्यातील खेळाडूंनी दर्जेदार कामगिरी करत आंतरराष्ट्रीय स्तरावर लौकिक वाढविला आहे. अशा खेळाडूंना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणं ही आपली जबाबदारी आहे.

पुढील काळातही आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू घडावेत, शहरी आणि ग्रामीण भागातील खेळाडूंना सुविधा मिळाव्यात यासाठी राज्य शासन सदैव तत्पर आहे. त्यामुळे उपरोक्त संदर्भाधिन शासन निर्णयान्वये सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात तालुका क्रीडा संकुल मेहकर साठी १ कोटी रुपये निधी वितरित करण्यात आला आहे.या निधीद्वारे खेळाडूंसाठी पायाभूत सुविधा निर्माण करण्यात निश्चित फायदा होईल अशी अपेक्षा आहे. असे पत्र क्रीडा व युवक कल्याण मंत्री दत्तात्रय भरणे यांनी मेहकर लोणार मतदार संघाचे आमदार सिद्धार्थ खरात यांना दिले आहे.

मेहकर लोणार मतदार संघासाठी तब्बल एक कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. याचा फायदा मेहकर शहरातील व तालुक्यातील खेळाडूंना होणार असल्याचे प्रतिक्रिया युवकांमधून व्यक्त केल्या जात आहे. तब्बल एक कोटी रुपयांचा निधी मंजूर करून तो वितरित केल्याबद्दल तालुक्यामध्ये सर्वत्र खेळाडूंमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

## विविध वृत्त...


### केंद्रीय राज्यमंत्री ना. प्रतापराव जाधव यांचा जिल्हा दौरा

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी :** केंद्रीय आयुष, आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री ना. प्रतापराव जाधव हे शुक्रवार दि. ७ मार्च रोजी बुलढाणा जिल्हा दौऱ्यावर येणार आहेत.

त्यांच्या दौरा कार्यक्रमानुसार सकाळी १० वाजता मेहकर येथील कार्यालयात नागरिकांशी भेट व चर्चा. दुपारी २ वाजता मातोश्री शिवाजी नगर मेहकर येथुन धामणगांव(धाड) ता.जि. बुलढाणाकडे प्रस्थान. सायंकाळी ४ वाजता धामणगांव(धाड) येथे सदिच्छा भेट व सायंकाळी ४.३० वाजता मासरुळ ता.जि.बुलढाणाकडे प्रस्थान. सायंकाळी ५.५० वाजता मासरुळ येथून मेहकरकडे रवाना होतील.

### सोशल मीडियावर आक्षेपार्ह पोस्ट टाकणाऱ्यावर गुन्हे दाखल करणार - जिल्हा पोलीस अधीक्षक




**दैनिक आपला विदर्भ**

**नंदुरबार/प्रतिनिधी :** नंदुरबार जिल्ह्यात सोशल मीडियावर आक्षेपार्ह पोस्ट टाकणाऱ्या युवकांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. यामुळे वातावरण खराब होऊन दोन समाजात तेढ निर्माण होण्याची शक्यता आहे त्यामुळे अशा पोस्ट टाकणाऱ्या युवकांवर गुन्हा दाखल करण्यात येईल असे जिल्हा पोलीस अधीक्षक श्रवण दत्त एस यांनी सांगितले. सध्या नंदुरबार जिल्ह्यात सोशल मीडियावर आक्षेपार्ह पोस्ट टाकणाऱ्या युवकांवर मोठ्या प्रमाणात गुन्हे दाखल होत आहे. त्यामुळे कायदा व सुव्यवस्थाचा प्रश्न निर्माण होऊन वातावरण खराब होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे दोन समाजात तेढ निर्माण होईल म्हणून कोणत्याही युवकांनी सोशल मीडीयावर अशी पोस्ट व्हायरल करू नये अशा प्रकारचे पोस्ट व्हायरल केल्यावर संबंधित युवकावर कडक कारवाई करण्यात येईल असे जिल्हा पोलीस अधीक्षक श्रवण दत्त एस यांनी सांगितले आहे.

### सोलापुरातून बारा बांगलादेशींना अटक



**दैनिक आपला विदर्भ**

**सोलापूर/प्रतिनिधी :** बनावट आधारकार्डचा वापर करून सोलापुरात राहणाऱ्या १२ बांगलादेशी नागरिकांना पोलिसांनी केली अटक केली आहे. या प्रकारामुळे मात्र, बांगलादेशी देशातील विविध भागात वस्तव्यास असल्याचे संशय व्यक्त केला जात आहे.

सोलापुरातील एमआयडीसी परिसरातील एका गारमेंट कारखान्यात हे सर्वजन कामगार म्हणून होते. सोलापूर शहर पोलिसांना या बाबतीत गुप्त बातमीदार मार्फत माहिती मिळाल्यानंतर पोलीसांनी या सर्व बांगलादेशी नागरिकांना ताब्यात घेत चौकशी केली असता यावेळी त्यांच्याकडे बनावट आधार कार्ड असल्याचे पोलिसांना आढळून आले आहे. दरम्यान या सर्व लोकांना पोलिसांनी अटक केली असून त्यांना आज न्यायालयात हजर केलं जाणार असल्याची सोलापूर पोलीस आयुक्ताची माहिती दिली. शिवाय सोलापुरात राहण्यासाठी त्यांना कोणी मदत केली. त्यांनी बनावट कागदपत्र कशी आणि कुठून मिळवली याचा तपास सुरु असल्याची माहिती पोलीस आयुक्त एम.राजकुमार यांनी दिली.

### श्रीरामपूर मधुन सोने पैसै चोरणारी टोळी पोलिसांच्या अटकेत

**दैनिक आपला विदर्भ**

**अहिल्यानगर/प्रतिनिधी :** श्रीरामपूर येथे वृध्द महिलेच्या घरावर दरोडा घालणाऱ्या टोळीतील आरोपी जेरबंद करण्यात आले असुन आरोपीकडून गुन्हयातील मुद्देमालही जप्त केला आहे. स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई आहे. खानापूर, ता.श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर येथे अज्ञात आठ इसमांनी एका वृद्ध महिलेच्या घरी प्रवेश करून तिला कोयत्याचा धाक दाखवून, तोंड दाबुन फिर्यादीच्या अंगावरील व घरातील सोन्याचे दागिने व रोख रक्कम असा ९ लाखांचा मुद्देमाल बळजबरीने पळवून नेला. यातील सर्व आरोपींवर श्रीरामपूर तालुका पोलीस ठाणे गु.र.नं.१०२/२०२५ बीएनएस कलम ३१० (२) प्रमाणे दरोडयाचा गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

## शाळा, अंगणवाडीतील मुलामुलींच्या आरोग्य तपासणीला सुरुवात

### ३३ आरोग्य पथक नियुक्त; तालुकानिहाय दररोज गावभेटी

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी :** सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण विभागामार्फत राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत १ मार्चपासून जिल्ह्यातील शासकीय, निमशासकीय शाळा आणि अंगणवाडीतील ० ते १८ वयोगटातील मुलामुलींची आरोग्य तपासणी केली जात आहे.

या कार्यक्रमांतर्गत ३३ आरोग्य पथकाकडून तालुकानिहाय गावांमध्ये जावून मुलामुलींची दररोज आरोग्य तपासणी केली जात आहे. यात बुलढाणा ४, मेहकर ३, लोणार २, देऊळगाव राजा २, मोताळा २, नांदुरा २, जळगांव जामोद २, शेगाव २, संग्रामपूर २, मलकापूर २, सिंदखेडराजा २ खामगांव ४ आणि चिखली तालुक्यासाठी ४ आरोग्य पथक नेमण्यात आले आहेत.

आज 'या' गावात आरोग्य पथक हे आरोग्य पथक शुक्रवारी दि. ७ मार्च रोजी बुलढाण्यातील सिंदखेड, उंबरखेड, तराडखेड येथील अंगणवाडी आणि जि.प उर्दू शाळा देऊळघाट मधील विद्यार्थ्यांच्या आरोग्य तपासणीसाठी तालुकानिहाय दाखल होणार आहे. यासह चिखली तालुक्यातील आसोला, सवना, अंबाशी आणि सोमठाणा, देऊळगाव राजा तालुक्यातील पिंपळगांव (बु), सावखेड भोई, जळगाव जामोद तालुक्यतील पळशी सुपो, खामगांवमधील कांचनपूर, वडजी भेंडी, कुऱ्हा आणि घारोड, लोणार तालुक्यातील कौलखेड, न.प शाळा क्रमांक ३, मलकापूरमधील शनिमंदीर आणि मेहकरमधील वरवंड येथे मुलामुलींच्या आरोग्य तपासणीचे नियोजन करण्यात आले आहे.

या तपासणीसाठी नियुक्त पथकामध्ये पुरुष व महिला अधिकारी, औषधनिर्माण अधिकारी, आरोग्य सेविका यांचा समावेश आहे. उच्चस्तरीय उपचार व शस्त्रक्रियेसाठी रुग्णालयांमध्ये पाठविण्यात येणार आहे. शासकीय, निमशासकीय शाळा आणि अंगणवाडीतील विद्यार्थी आणि गैरहजर राहिलेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांनी आपल्या मुलामुलींची आरोग्य तपासणी करुन घेण्याचे आवाहन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. भागवत भुसारी यांनी केले आहे.

## शहरातील नागरिकांनाही घरकूल !

### प्रधानमंत्री आवास योजना २.०; ऑनलाईन नोंदणीची सुविधा

**बुलढाणा/प्रतिनिधी :** केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री आवास योजना शहरी २.० या महत्त्वाकांक्षी योजनेच्या माध्यमातून शहरी भागातील गरजू नागरिकांना घरकुल देण्यात येत आहेत. या योजनेअंतर्गत नवीन घरकुल मंजुरीसाठी शहरी भागातील पात्र लाभार्थ्यांची ऑनलाईन नोंदणी सुरु करण्यात आली असून इच्छुकांनी जवळील सीएससी सेंटरवर ऑनलाईन नोंदणी करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे

जिल्ह्यातील शहरी नागरिकांना याद्वारे आव्हान करण्यात येते की प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) २.० अंतर्गत नवीन घरकुल मंजुरीकरीता https://pmaymis.gov.in/PM-YMIS2š2024/PmayDefault.aspx हे वेबपोर्टल सुरु करण्यात आले आहे. इच्छुक लाभार्थ्यांना या वेबपोर्टलच्या माध्यमातून सी.एस.सी. सेंटरवर ऑनलाईन नोंदणी करता येणार आहे.

**पात्रता :** प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) २.० अंतर्गत नवीन घरकुलासाठी पात्रता निश्र्चित करण्यात आली असून त्यानुसार लाभार्थी तसेच कुटुंबामधील इतर सदस्यांच्या नावे देशाच्या कोणत्याही भागात पक्के घर नसावे. लाभार्थ्याने गेल्या २० वर्षात कोणत्याही घरकुल योजनेचा लाभ घेतलेला नसावा. वार्षिक उत्पन्न मर्यादा ४.५ लक्ष रुपये कमाल राहील.

**ही कागदपत्रे आवश्यक :** नवीन घरकुल नोंदणी ऑनलाईन करण्याकरीता आवश्यक कागदपत्रे सादर करणे गरजेचे आहे. त्यानुसार अर्जदार यांचे मोबाईल नंबर लिंक असलेले आधारकार्ड, तहसिल कार्यालयातील उत्पन्नाचे चालु वर्षाचे प्रमाणपत्र, जात प्रमाणपत्र, आधार लिंक असलेले बँकेचे पासबुक, जमिनीचे पुरावे जसे (सातबारा, आखिव पत्रिका, शासकीय जागेचा पट्टा, मालमत्ता पत्रक, टॅक्स असेसमेंट नक्कल चालु ३ महिन्यातील), खरेदीखत, अर्जदार यांचे आई व वडीलांचे आधारकार्ड(हयात नसल्यास मुत्यु प्रमाणपत्र), अर्जदार यांचे कुटूंबामधील सर्व सदस्यांचे आधारकार्ड (पती/पत्नी व मुले) , पी.एम. स्वनिधी, इमारत बांधकाम कामगार, पी.एम विश्र्वकर्मा इ. योजनेचा लाभार्थी असल्यास नोंदणी प्रत, चालु वर्षाची नगर परिषद कर भरल्याची पावती, रेशनकार्ड असणे आवश्यक आहे.

नोंदणीबाबत लाभार्थ्यांना काही अडचण असल्यास नगर परिषदेतील प्रधानमंत्री आवास योजना कक्षाची मदत घ्यावी आणि ऑनलाईन अर्ज केल्यानंतर कागदपत्रांची संचिका नगरपरिषद कार्यालयात सादर करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

## जिल्हा परिषदेच्या इतिहासात पहिल्यांदाच प्रशासकाने सादर केला अर्थसंकल्प

**दैनिक आपला विदर्भ**

**नंदुरबार/प्रतिनिधी :** जिल्हा परिषदेचा कार्यकाल पूर्ण झाल्यामुळे जिल्हा परिषदेवर प्रशासक नेमण्यात आले आहे. म्हणून यंदाचा जिल्हा परिषदेचा सुधारित अर्थसंकल्प जिल्हा परिषदेचे मुख्य प्रशासक व मुख्य कार्यकारी अधिकारी सावंन कुमार यांनी आज सादर केला. नंदुरबार जिल्हा झाल्यानंतर पहिल्यांदाच जिल्हा परिषदेमध्ये प्रशासकामार्फत अर्थसंकल्प सादर करण्यात आला आहे. जिल्हा परिषद नंदुरबारच्या स्व-उत्पन्नाचे सन २०२४-२५ चे रुपये- ३८.४७ कोटी रक्कमेचे सुधारीत व सन २०२५-२६ चे रुपये-४०.४८ कोटी रक्कमेचे मूळ




अंदाजपत्रकास प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मान्यता दिली. जिल्हा परिषदेच्या अंदाजपत्रकात मानव विकास निर्देशांकाशी संबधित आरोग्य, शिक्षण, ग्रामीण पाणी पुरवठा, विभागांतर्गत योजनांवर विशेष भर देण्यात आलेला आहे. तसेच बांधकाम विभागांतर्गत ग्रामिण रस्ते विशेषतः संपर्क विरहित गावांना साकव पुल, लघुसिंचन विभागातर्गत विकास योजना, महिला व बालकल्याण विभागांतर्गत विकास योजना, समाजकल्याण, दिव्यांग कल्याण इत्यादी योजनांवर देखील निधीची तरतुद करण्यात आलेली आहे. सदर तरतुदी करतांना शासनाच्या मार्गदर्शक सुचनाप्रमाणे अंदाजपत्रकात संविधानिक तरतुदी जसे २० % समाज कल्याण विभाग, १० % महिला व बाल कल्याण, २० % देखभाल दुरुस्ती वर्गणी, ५ % दिव्यांग कल्याण, ५ % जि.प. शाळा दुरुस्ती अशा तरतुदी करण्याची दक्षता घेण्यात आलेली आहे.